**मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.**

**तक्रार क्रमांक - २००६/१६/०२**

**श्री. दिनोश दगाजी गांगुर्डे ---तक्रारदार**
**मु.पो. प्रतापपुर, ता.साक्री,**
**जिल्हा- धुळे.**

**विरुध्द**

**१.अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी -- उत्तरवादी**
**धुळे.**
**२.तहसिलदार ,साक्री**

**--- <u>वि वे च न</u> ---**

श्रीयुत.दिनेश दगाजी गांगुर्डे , मु.पो. प्रतापपूर, ता.साक्री, जि.धुळे यांनी दिनांक ४/४/२००६ रोजी आयोगाकडे अशी तक्रार केली की, राजेंद्र पंडित ठाकरे यांची मालकीचा जय संतोषी मॉ विट भटटी कारखाना छाईल, ता.साक्री, जि.धुळे हा गेल्या ६-७ वर्षापासून अनधिकृतपणे सुरु आहे. व त्यामध्ये इंधन म्हणून घातक घनकचरा वापरत आहे व त्यामुळे प्रदुषण होवून ग्रामस्थांना त्याचा त्रास होतो. यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय , उप विभागीय अधिकारी, धुळे विभाग, तहसिलदार साक्री वगैरेकडे तक्रार अर्जाद्वारे तक्रार केली व त्या विषयास अनुसरुन कांही माहिती मागितली. ही माहिती देण्यास जाणून बुजून टाळाटाळ होत आहे. या अर्जासोबत दिलेल्या प्रतीवरुन असे दिसते की, श्री.दिनेश दगाजी गांगुर्डे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दि. १७ व १८/३/२००६ रोजी वरील विटभटटयासंबंधी होणा-या प्रदुषणासंबंधी माहितीचा अधिकार अधिनियमान्वये अर्ज केला होता. त्यातील एका अर्जास अनुसरुन वरील बाबीसंबंधी माहिती व कागदपत्रे उप विभागीय अधिकारी ,धुळे विभाग धुळे यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी असे दि. २१/३/२००६ रोजीच्या पत्राने अर्जदारास कळविण्यांत आले आहे. दुसरे असे की, अर्जदारानेच कागदपत्रे सादर केली आहेत त्यातील अर्ज व अपील यांची निट सांगड लागत नाही.

वरील तक्रार अर्जाची सुनावणी दि. ८ ऑगस्ट २००६ रोजी ठेवण्यांत आली होती. त्यावेळेला अर्जदार गैरहजर होते. मात्र तहसिलदार कार्यालयातर्फे श्रीयुत. सुदाम शिवराम महाजन, निवासी नायब तहसिलदार हजर होते. त्यांनी असे सांगितले की, तहसिलदार कार्यालयामध्ये सुध्दा श्री.गांगुर्डे यांनी अर्ज केला होता व त्यानुसार त्यांना तहसिलदार कार्यालयामध्ये बोलाविण्यात आले होते. पण नेमकी कोणती माहिती पाहिजे हे ते सांगू शकले नाहीत म्हणून अर्ज निकाली काढला.

यासंबंधीची कागदपत्रे पाहिली असता असे दिसून येते की, अर्जदार हे गेल्या २ वर्षापासून या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहेत. त्यामुळे त्यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे हे व्यवस्थितपणे सांगू शकत नाहीत यावर विश्वास बसणे कठीण आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला अर्ज हा त्याच्याशी संबंधित नव्हता तर त्यांनी तो स्वतःच उप विभागीय अधिकारी, धुळे यांचे कार्यालयाकडे पाठविणे व त्या अर्जानुसार उपविभागीय अधिका-यांनी माहिती देणे हे माहितीचा अधिकार कायद्याशी सुसंगत झाले असते. पण जिल्हाधिकारी कार्यालयाने तसे न करता अर्जदारासच उप विभागीय अधिकारी, धुळे विभाग धुळे यांचे कार्यालयाशी संपर्क साधण्यास सांगितले हे गैर आहे.

एकंदर तक्रारकर्त्यांनी सुध्दा अर्ज दिल्यानंतर एक महिन्याची वाट न पाहता या आयोगाकडे धाव घेतलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये अर्जदारास माहिती मिळण्याच्या दृष्टीकोनातून मी पुढील आदेश देत आहे.

<u>*--आदेश--*</u>

१. तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. उपविभागीय अधिकारी, धुळे विभाग, धुळे यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये तहसिलदार साक्री तसेच अर्जदार यांना दिनांक २१ ऑगस्ट २००६ रोजी बोलावून घ्यावे व या प्रकरणात तहसिलदार कार्यालय, उप विभागीय अधिकारी यांचे कार्यालय यांचेकडून या विषयासंबंधी असलेली सर्व कागदपत्रे दाखवावीत व ज्या कागदपत्रांच्या (पंचनामा, जाबजबाब इत्यादी..) प्रती पाहिजे असतील त्या प्रती त्यांना कोणतीही फी वसूल न करता देण्यांत याव्यात.

(सुरेश व्ही. जोशी)
मुख्य माहिती आयुक्त

मुंबई, दिनांक ८ ऑगस्ट २००६.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्रमांक - २००६/१८/०२

श्री. शिवाजी पांडुरंग राउत ---तक्रारदार
प्रिय बापू १७२/९/१० एस.टी.कॉलनी.
मोनार्क नजीक, सातारा.

विरुध्द

१.शासकिय माहिती तथा कृषि उपसंचालक -- उत्तरवादी
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय,
सातारा.

--- वि वे च न ---

श्री.शिवाजी पांडुरंग राउत, सातारा यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) अन्वये ही तक्रार आयोगाकडे दाखल केलेली आहे.

श्रीयुत. शिवाजी राउत यांनी दि. २१/१/२००६ रोजी जन माहिती अधिकारी, कृषि उपसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालय,सातारा यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ अन्वये अर्ज करुन वडूज रोहयो कामाची चौकशी करण्यात आली त्या २२५ पानांच्या अहवालाची प्रत मागणी करण्याचा अर्ज दिला. या अर्जास अनुसरुन दि. १३/२/२००६ रोजी श्रीयुत शिवाजी राउत यांनी रु. २७८/- रोखीने भरल्यामुळे १ ते १३९ पृष्ठ क्रमांक असलेल्या अहवालाची प्रत श्रीयुत. राउत यांना दिली. प्रत्यक्षात ७१ च पृष्ठे असल्यामुळे रु.१४२/ शुल्क व्हायला पाहिजे होते. म्हणजेच रु.१३६/- जादा भरायला लागले ही श्रीयुत.राउत यांची तक्रार आहे.

वरील तक्रारीची सुनावणी दि. ११ ऑगस्ट २००६ रोजी ठेवण्यात आली होती. त्यावेळेस अर्जदार श्रीयुत.राउत हे अनुपस्थित होते, पण श्रीयुत. जितेंद्र पांडुरंग शिंदे कृषि उपसंचालक हे उपस्थित होते. जादा शुल्क का आकारले गेले याचे स्पष्टीकरण देतांना श्रीयुत.शिंदे यांनी सांगितले की, सदरील अहवालाचे पृष्ठांकन हे पृष्ठ क्र.१/प, २/प ,३/प,४/प, पृष्ठ.५/प .......पृ.१३९/प असे होते. त्यामुळे शेवटच्या पृष्ठाचे पृष्ठक्रमांक पाहून उक्त आकारणी

करताना १३९ पृष्ठा करीता रु.२/- प्रमाणे रु. २७८/- आकारले गेले. ही बाब जनमाहिती अधिका-यांच्याही लक्षात आली नाही किंवा श्रीयुत. राउत यांच्याही लक्षात आली नाही. कारण त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात प्रस्तुत माहितीची १ ते १३९ पाने मिळाली असे लिहून त्यावर दि.१३/२/०६ रोजी स्वाक्षरी केलेली आहे.

वस्तुतः सदर पृष्ठवर एकाच बाजूने माहिती असल्यामुळे निव्वळ झेरॉक्स करण्यायोग्य ७१ पृष्ठ होते. म्हणजेच रु.२/- प्रत याप्रमाणे रु.१४२/- इतके शुल्क आकारणे आवश्यक होते. म्हणजेच रु.१३६/- जादा आकारले गेले आहेत.

वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, श्रीयुत.राउत यांना जादा रु.१३६/- आकारले गेलेले आहेत. मात्र वरील खुलासा पाहता जादा शुल्क आकारताना कुठचाही असदहेतू दिसून येत नाही, केवळ नजरचुकीने हे घडले आहे. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिका-यांना दंड करावा अशी ही बुध्दीपुरस्सर कृती नाही, त्यामुळे पुढील आदेश देत आहे.

*--निर्णय--*

१. तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२. अर्जदारास रु.१३६/- त्वरित परत करण्यांत यावेत.

(सुरेश व्ही. जोशी)
मुख्य माहिती आयुक्त

मुंबई, दिनांक ११ऑगस्ट २००६.

मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार.

तक्रार क्रमांक - २००६/१३/०२

श्रीमती. राजश्री किशोर इंगळे ---तक्रारदार
अे-४ अे-१८, रेल विहार,
बिजली नगर, चिंचवड पुणे.

विरुध्द

१.मुख्य प्रशासकीय अधिकारी -- उत्तरवादी
पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,
सेक्टर क्र.२४, निगडी, पुणे- ०४४

--- वि वे च न ---

श्रीमती.राजश्री किशोर इंगळे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १६ अन्वये जन माहिती अधिकारी पिंपरी चिंडवड नवनगर विकास प्राधिकरण यांच्याकडे अर्ज करुन पुढील माहिती विचारली.

३(अ) जोत्यापर्यंतचे बांधकाम व आजूबाजूला सोडलेली मोकळी जागा, नकाशाप्रमाणे बरोबर असल्याचे प्रमाणपत्र आणि जोत्याचे वरील बांधकाम सुरु करण्याची परवानगी. ३ (क) इंडियन रेल्वे वेलफेअर ऑर्गनायझेशन (आय.आर.डब्ल्यू.ओ.) पुणे यांनी सुयोजन (दिपक कंबुज आणि सौ. राजोल कंबुज )या शिल्पशास्त्र (आर्किटेक्ट)संस्थेमार्फत सादर केलेले, रेलविहार ग्रूप हौसिंग प्रोजेक्ट, पेठ क्र. ३०-३१ ,आकुर्डी ,प्राधिकरणचे मंजूरीसाठी पाठविलेले नकाशे आणि प्राधिकरणाने, क्रमांक डी.अे/२६/३०-३१ इरवो (आय.आर.डब्ल्यू.ओ.)दिनांक ०४/०५/१९९८ नुसार दिलेली नकाशांची मंजूरी.

यापैकी मुददा क्र. ३ अ व क च्या बाबतीतील सविस्तर माहिती त्या कार्यालयाने दि.२७/१२/२००५ रोजी दिली होती मात्र मुददा क्रमांक ३ अ बाबतच्या कागदपत्रासाठी रु.५०/- इतकी रक्कम दि.४/१/२००६ रोजी भरुन त्यांना कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे त्यांनी

आयोगाकडे दि.२४/२/२००६ रोजीचा तक्रार अर्ज दाखल केला. वरील अर्जाची सुनावणी दिनांक ११ ऑगस्ट २००६ रोजी घेण्यांत आली. त्यावेळेला असे सांगण्यांत आले की, अर्जदार सौ.इंगळे यांना हवी असेलेली कागदपत्रे दि.१०/३/२००६ रोजी देण्यांत आलेली आहे. आता त्यांची कुठचीही तक्रार राहिलेली नाही असे त्यांनी आयोगास तसेच प्राधिकरणास दि.३१/७/२००६ च्या पत्राने कळविलेले आहे.

अशाप्रकारे जरी अर्जदाराच्या तक्रारीचे निवारण झाले असले तरी माहितीचा अधिकारात मागितलेली माहिती ही मुदतीत द्यायची असते, व ती तशी न दिल्याबददल जनमाहिती अधिका-यांना समज देण्यांत येत आहे.

***--आदेश--***

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(सुरेश व्ही. जोशी)
मुख्य माहिती आयुक्त

मुंबई, दिनांक ११ऑगस्ट २००६.